# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस निरीक्षक शिरपुर शहर पो.स्टे. सत्यमेव जयते

1. **District (जिल्हा):** धुळे  **P.S.(ठाणे):** शिरपुर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0014  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/01/2026 21:44

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 12/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/01/2026
**Time From (वेळेपासून):** 12:39 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:39 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/01/2026  **Time (वेळ):** 21:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/01/2026 21:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शिरपुर येथील करवंद नाकयावरील श,शहादा रोड लगत असलेल्या शाम का, समोरील जय गुरुदेव वडापावचे स
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): पद्मावती मधुसुदन कलाल
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983
   (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
   **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रविभाग, धुळे,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रविभाग, धुळे,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

   (i) **Occupation** (व्यवसाय):
   (j) **Phone number** (फोन नं.):
   **Mobile** (मोबाइल नं.): 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकेश गिलदार पावरा 1593 | | | 1. थाळनेर पोलीस स्टेशन , िशरपुर ,शिरपुर शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |
| 2 | भुषण यशुपाल रामोळे पोहेका 7 | | | 1. थाळनेर पोलीस स्टेशन ,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत<br>2. निमझरी नाका शिरपुर ता िशरपुर ि,शिरपुर शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | धनराज बबन मालचे पोका1458 | | | 1. थाळनेर ता िशरपुर िज धुळे ,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 4 | िकरण सखाराम सोनवणे पोका1696 | | | 1. करवंद नाका शिरपुर ता िशरपुर िज,शिरपुर शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलन | 200,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

200,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी पद्मावती मधुसुदन कलाल, वय ४३ वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यांपासुन कार्यरत आहे. दि.०८. ०१.२०२६ रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी तकारदार सागर मुसा पावरा यांनी त्यांच्याकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची माहिती दुरध्वनीव्दारे कळविल्याचे सांगुन आम्हास शिरपुर येथे जावुन तकारदार यांची तकार नोंदवुन पुढील कार्यवाही करण्यास आदेशित केले. त्याप्रमाणे आम्ही जिल्हा हिवताप अधिकारी, धुळे येथील दोन शासकिय कर्मचारी कमलेश पाटील, आरोग्य सेवक व उत्रेश्वर कावळे, आरोग्य निरीक्षक यांना उपलब्ध करुन घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी कार क्र. एम.एच. १८ बीआर १९३४ ने रवाना होवुन बभळाज, ता. शिरपुर येथे बांधकाम सुरु असलेल्या फार्मसी कॉलेजच्या प्रवेशव्दाराजवळ पोहोचलो. तेव्हा ठरल्याप्रमाणे तकारदार सागर मुसा पावरा व त्यांचे सोबत कालुसिंग सुकलाल पावरा हे आम्हास सदर ठिकाणी भेटले. तेव्हा आम्ही त्यांना आमचे वाहनात बसवुन घेवुन त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेवुन त्यांना दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव सागर मुसा पावरा, रा. महादेव दोंदवाडा, नागेश्वरपाडा, ता. शिरपुर, जि. धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तकारीची तोंडी हकीगत सांगितली, तक्रारदार यांना वाचता व लिहीता येत नसल्याने आमचे सुचनेवरुन तकारदार यांचे सांगणे प्रमाणे पंच क्र. ०१ कमलेश पाटील यांनी तक्रारदार यांची तकार लिहुन घेतली ती " माझे वडील मुसा मालसिंग पावरा यांचेविरुध्द दि.१८.१०.२०२३ रोजी थाळनेर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५७/२०२३ अंमली पदार्थ विरोधी कलम २० व २२ अन्वये गुन्हा दाखल झाला असुन सदर गुन्हयाचा तपास थाळनेर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी शत्रुघ्न पाटील यांचेकडे आहे. सदर गुन्हयात माझे वडीलांना अद्याप अटक झालेली नाही. दरम्यान थाळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार भुषण रामोळे, पोलीस कॉन्स्टेबल धनराज मालचे, पोलीस कॉन्स्टेबल किरण सोनवणे व पोलीस कॉन्स्टेबल मुकेश पावरा अशांनी सुमारे एक महिन्यापुर्वी माझ्या वडीलांना आमच्या राहते घरुन थाळनेर पोलीस स्टेशन येथे सोबत घेवुन गेले होते. तेव्हा मी थाळनेर पोलीस स्टेशन येथे गेलो असता "तुझ्या वडीलांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. त्यांना अटक होवु द्यायची नसेल तर ३,००,०००/- रुपये द्यावे लागतील नाहीतर तुझ्या वडीलांना अटक करुन जेलमध्ये टाकुन देवु" असे सांगुन त्यांनी माझ्या वडीलांना सोडुन दिले होते. सुमारे २/३ दिवसापुर्वी पोलीस हवालदार भुषण रामोळे, पोलीस कॉन्स्टेबल धनराज मालचे, पोलीस कॉन्स्टेबल

किरण सोनवणे व पोलीस कॉन्स्टेबल मुकेश पावरा हे मला अजनाड बंगला येथील नागेश्वर मंदिराजवळ पुन्हा भेटले, तेव्हा त्यांनी मला "तुझ्या वडीलांना अटक होवु द्यायची नसेल तर तुला कमीत कमी २,००,०००/- रुपये द्यावे लागतील. नाहीतर त्यांना अटक करुन जेलमध्ये टाकतो, लवकर पैसे घेवुन ये" असे सांगितल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी पो.ह. भुषण रामोळे, पो. कॉ. मुकेश पावरा, धनराज मालचे व किरण सोनवणे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.दरम्यान १६:३० वाजेच्या सुमारास पो.कॉ. मुकेश पावरा व १६:४० वाजेच्या सुमारास पो.कॉ. धनराज मालचे यांनी तक्रारदार यांच्यासोबत आलेले कालुसिंग पावरा यांच्या मोबाईलवर . फोन करुन तक्रारदार यांना नागेश्वर मंदिराजवळ घेवुन येण्यास सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन पो.कॉ. मुकेश पावरा व धनराज मालचे यांची नागेश्वर मंदिराजवळ भेट घेण्यासाठी तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम. एच. १८ जीएल ०४३० ने तक्रारदार सागर पावरा, कालुसिंग पावरा व पंच नं. ०१ कमलेश पाटील यांना रवाना केले. त्यानंतर बऱ्याच वेळाने तक्रारदार सागर पावरा, कालुसिंग पावरा व पंच कमलेश पाटील असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. ०१ पाटील यांनी नागेश्वर मंदिर येथे तकारदार, त्यांचे सोबत आलेले कालुसिंग पावरा व मी असे धांवून असतांना तेथे पोलीस गाडीत पो.ह. भूषण रामोळे, पो. कॉ. मुकेश पावरा, धनराज मालचे व किरण सोनवणे आले. तेव्हा त्यांच्यात व तकारदार सागर पावरा, कालुसिंग पावरा यांचेत चर्चा झाली. चर्चेदरम्यान त्यांनी तकारदार यांच्याकडे ३,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,००,०००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पो.ह. भुषण रामोळे, पो. कॉ. मुकेश पावरा, धनराज मालचे व किरण सोनवणे व तकारदार सागर पावरा, कालुसिंग पावरा यांचेतील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ऐकुन पो.ह. भुषण रामोळे, पो. कॉ. मुकेश पावरा, धनराज मालचे व किरण सोनवणे यांनी तकारदार यांचे वडीलांना गुन्हयात अटक न करण्यासाठी तकारदार यांचेकडे तडजोडीअंती २,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन केलेल्या लाच मागणीस एकमेकांना दुजोरा दिल्याची खात्री झाली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर आज रोजी दोन्ही पंच, आम्ही व सापळा पथक असे खाजगी वाहन कमांक एम. एच. १८ बीआर १९३४ व एम.एच. १५ केजी ५१११४ ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन शिरपुर येथील करवंद नाक्याजवळ पोहोचलो. तेथे ठरल्याप्रमाणे तकारदार सागर पावरा व त्यांचे सोबत असलेले कालुसिंग पावरा यांची भेट झाली. त्यानंतर त्यांचेशी चर्चा करुन आम्ही सापळा आयोजित केला. तेव्हा तकारदार यांनी त्यांच्याकडे सापळाकामी देण्याकरीता पैसे नसल्याचे सांगितल्याने आम्ही आमच्याकडे उपलब्ध असलेल्या ५००/- रुपये दराच्या ४०० नोटा असे एकुण २,००,०००/- रुपयांच्या अचलनीय नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या अंगातील स्वेटरच्या उजव्या खिशात ठेवली. दरम्यान दुपारी १२:१२ वाजेच्या सुमारास पो.कॉ. मुकेश पावरा यांनी कालुसिंग पावरा यांना फोन करुन तक्रारदार सागर पावरा यांना पैशांसह करवंद नाका येथे घेवुन येण्यास सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तकारदार सागर पावरा, कालुसिंग पावरा व पंच नं. ०१ कमलेश पाटील अशांना तक्रारदार यांच्या दुचाकी क्र. एम. एच.१८ सीसी ७८३६ ने शिरपुर येथील करवंद नाका येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही खाजगी वाहनांनी जावुन करवंद नाक्याच्या परिसरात आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तकारदार यांनी करवंद नाक्यावरील शहादा रोडलगत असलेल्या शाम कॉम्प्लेक्सच्या समोरील जय गुरुदेव वडापावच्या गाडीजवळुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने पो.कॉ. मुकेश पावरा यांना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. ०२ उत्रेश्वर कावळे यांनी पो.कॉ. मुकेश पावरा यांच्या जवळील शासकिय दुचाकी क्रमांक एम.एच.१८ बीडब्ल्यु ५६३८ च्या डिक्कीतुन २,००,०००/- रुपये लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर पो.कॉ. मुकेश पावरा यांना ताब्यात घेवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. अशा प्रकारे तक्रारदार सागर मुसा पावरा यांच्या वडीलांना गुन्हयात अटक न करण्यासाठी पो.ह. भुषण यशुपाल रामोळे, पो. कॉ. मुकेश गिलदार पावरा, धनराज बबन मालचे व किरण सखाराम सोनवणे यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी पंचांसमक्ष तडजोडीअंती २,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन केलेल्या लाच मागणीस एकमेकांना दुजोरा देवुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आज दि.१२.०१.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष शिरपुर येथील करवंद नाक्यावरील शहादा रोडलगत असलेल्या शाम कॉम्प्लेक्सच्या समोरील जय गुरुदेव वडापावच्या गाडीजवळ १२:३९ वाजता पो.कॉ. मुकेश पावरा यांचे हस्ते स्विकारुन त्यांनी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे माझी

कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

kishorkumar Bhilasing pardeshi(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शिरपुर शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): kishorkumar Bhila
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):